PRGI REGISTRATIION NO. MHAR/26/A4298

# मेट्रो रायगड
METRO RAIGARH

| Vol. No... 1 | Issue No. 10 | 6th AUGUST, 2026 | Price Rs. 5/- | Annual Subscription Rs. 500

BREAKING घडामोडी

## खुशबू ठाकरे मृत्यूप्रकरणी दीड वर्षांनंतर एफआयआर

**। पेण ।** पेण तालुक्यातील वरवणे येथील आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थिनी खुशबू नामदेव ठाकरे हिच्या मृत्यूप्रकरणी दीड वर्षांनंतर अखेर पेण पोलिस ठाण्यात वैद्यकीय अधिकारी डॉ. ममता मधुकर गजबे यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम १०६(१) अंतर्गत एफआयआर दाखल करण्यात आला. उपचारातील निष्काळजीपणाचा आरोप करत खुशबूच्या वडिलांसह ग्राम संवर्धन सामाजिक संस्था आणि राजीव गांधी पंचायतराज संगठन यांनी सातत्याने न्यायासाठी पाठपुरावा केला होता. ३० जुलै २०२६ रोजी पेण उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर सुरू करण्यात आलेल्या आमरण उपोषणानंतर प्रशासनाने हालचाल करत एफआयआरची प्रत आंदोलनकर्त्यांना दिली. त्यानंतर उपोषण तात्पुरते स्थगित करण्यात आले. दरम्यान, या प्रकरणातील सर्व संबंधितांची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच तपास जलदगतीने पूर्ण करून दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करावे, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे.

### एचएसआरपी नंबरप्लेटशिवाय वाहन चालवणाऱ्यांवर

# रायगड पोलिसांचा दंडुका

**८१७ वाहनचालकांवर कारवाई; ४ लाख २२ हजार ५०० रुपयांचा दंड वसूल**



**। अलिबाग ।** रायगड जिल्ह्यात उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक फलक एचएसआरपी नंबर प्लेट नसलेल्या वाहनांविरोधात पोलीसांच्या वाहतूक शाखेने धडक कारवाई सुरू केली आहे. जुलै महिन्यात मोठ्या प्रमाणावर वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. १ जुलै ते ४ ऑगस्ट या कालावधीत जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये विशेष तपासणी मोहीम राबवून ८१७ वाहनांवर कारवाई करण्यात आली. या कारवाईत एकूण ४ लाख २२ हजार ५०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. नियमांचे पालन न करणाऱ्या वाहनधारकांना स्पष्ट इशारा देण्यात आला आहे.

राज्य शासन आणि परिवहन विभागाच्या निर्देशानुसार सर्व जुन्या व नव्या वाहनांना एचएसआरपी नंबरप्लेट बसविणे अनिवार्य करण्यात आले आहे. या नंबरप्लेटमध्ये विशेष सुरक्षा वैशिष्ट्ये, लेझर कोड, क्रोमियम होलोग्राम आणि कायमस्वरूपी नोंदणी क्रमांक असल्यामुळे वाहनांची ओळख अधिक सुरक्षित होते. बनावट नंबरप्लेट तयार करण्यावर प्रतिबंध येण्याबरोबरच चोरीची वाहने शोधणे, गुन्ह्यांमध्ये वापरलेल्या वाहनांचा माग काढणे आणि वाहतूक व्यवस्थापन अधिक प्रभावीपणे करणे शक्य होते.


मात्र, शासनाच्या वारंवार सूचना आणि मुदतवाढ देऊनही अनेक वाहनधारकांनी अद्याप आपल्या वाहनांवर एचएसआरपी नंबरप्लेट बसविलेली नसल्याचे तपासणीत आढळून आले आहे. त्यामुळे रायगड जिल्हा वाहतूक शाखेने जिल्ह्यातील प्रमुख चौक, राष्ट्रीय व राज्य महामार्ग, शहरातील गर्दीची ठिकाणे तसेच महत्त्वाच्या मार्गांवर विशेष तपासणी मोहीम सुरू केली आहे. तपासणीदरम्यान एचएसआरपी नंबरप्लेट नसलेली वाहने आढळून आल्यास संबंधित वाहनचालकांवर मोटार वाहन कायद्यानुसार दंडात्मक कारवाई केली जात आहे. यात पहिल्या वेळी ५०० रुपये तर दुसऱ्या वेळी थेट १ हजार ५०० रुपये इतका दंड आकारला जातो.

वाहतूक पोलिसांनी वाहनधारकांना अधिकृत केंद्रातूनच एचएसआरपी नंबरप्लेट बसविण्याचे आवाहन केले आहे. अनधिकृत किंवा बनावट नंबरप्लेटचा वापर टाळण्याबरोबरच नियमांचे काटेकोर पालन करण्याचेही आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, एचएसआरपी नंबरप्लेटबाबतची तपासणी मोहीम आगामी काळात आणखी तीव्र करण्यात येणार असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनधारकांविरोधात कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असा इशारा वाहतूक विभागाने दिला आहे. त्यामुळे वाहनधारकांनी दंडात्मक कारवाई टाळण्यासाठी तातडीने आपल्या वाहनांवर अधिकृत एचएसआरपी नंबरप्लेट बसवून शासनाच्या नियमांचे पालन करावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## रामधरणेश्वर धरणात बुडून तरुणाचा मृत्यू

**। अलिबाग ।** अलिबाग तालुक्यातील मानी-वायशेत येथील रामधरणेश्वर धरणात पोहण्यासाठी उतरलेल्या एका २६ वर्षीय तरुणाचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना बुधवारी (दि. ५) सकाळी घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून पोलिसांकडून पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू आहे.



**मित्रांसमवेत फिरायला गेलेल्या युवकावर काळाचा घाला**

मिळालेल्या माहितीनुसार, नेहाल विजय शेट्टी (वय २६, रा. मेटपाडा, अलिबाग) असे मृत तरुणाचे नाव आहे. नेहाल हा आपल्या मित्रमंडळींसोबत मानी-वायशेत परिसरातील रामधरणेश्वर धरण परिसरात फिरण्यासाठी गेला होता. यावेळी धरणातील पाणी पाहून त्याला पोहण्याचा मोह आवरला नाही. तो पाण्यात उतरून पोहू लागला. मात्र, पाण्याची खोली आणि पातळीचा अचूक अंदाज न आल्याने तो अचानक खोल पाण्यात जाऊन बुडाला. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिक आणि पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. नेहाल याला पाण्याबाहेर काढून तात्काळ अलिबाग जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, तपासणीअंती डॉक्टरांनी त्याचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे घोषित केले. या दुर्दैवी घटनेमुळे शेट्टी कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरात शोककळा पसरली आहे. घटनेची नोंद संबंधित पोलीस ठाण्यात करण्यात आली असून मृत्यूची नोंद करून पुढील तपास व आवश्यक कायदेशीर प्रक्रिया सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

## महसूल प्रशासन अधिक गतिमान व लोकाभिमुख करा




**योजनांचा लाभ तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवा : महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे**

**। रायगड ।** महसूल प्रशासन अधिक गतिमान, पारदर्शक आणि लोकाभिमुख करण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने अनेक नावीन्यपूर्ण, ऐतिहासिक व महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. या निर्णयांची रायगड जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करून गोरगरीब लोकांच्या कल्याणकारी शासकीय योजनांचा लाभ तळागाळातील घटकांपर्यंत पोहोचवावा, असे स्पष्ट निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

अलिबाग येथे आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान व महसूल दिन कार्यक्रमात ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

या महत्त्वपूर्ण सोहळ्यास व्यासपीठावर खासदार सुनील तटकरे, माजी खासदार धैर्यशील पाटील, महिला व बाल विकास मंत्री कु.आदिती तटकरे, रोजगार हमी योजना, फलोत्पादन व खारभूमी विकास मंत्री भरत गोगावले, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार रविशेठ पाटील, आमदार महेंद्र दळवी, आमदार विक्रांत पाटील आणि सिंधुदुर्गचे आमदार प्रमोद जठार यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच स्थानिक स्वराज संस्थांचे प्रतिनिधी म्हणून जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर व कृषी सभापती वैकुंठ पाटील उपस्थित होते. प्रशासनाच्या वतीने कोकण विभागीय आयुक्त श्रीमती रुबल अग्रवाल, महसूल अपर आयुक्त श्रीमती वैशाली उंटवाल, रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल, अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे, जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख सुनील इंदुलकर आणि निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के या वरिष्ठ अधिकाऱ्यांची विशेष उपस्थिती होती.

(पान ३ वर)



## संपादकीय

# स्त्रीला गृहीत धरण्याची मर्दुमकी कसली?

राजकारणात मुद्द्यांना मुद्द्यांनी उत्तर देता येत नसेल, तर वैयक्तिक टीका, दुहेरी अर्थाची वक्तव्ये आणि स्त्रीच्या चारित्र्यावर भाष्य करण्याचा मार्ग स्वीकारला जातो. हा केवळ राजकीय संस्कृतीचा अधःपात नाही, तर समाजाच्या मानसिकतेवरही गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारा प्रकार आहे.

आज विविध राजकीय नेत्यांच्या वक्तव्यांवरून चर्चा सुरू आहे. एखाद्या महिला नेत्याबद्दल 'गुंगी गुडी'सारखी हिणकस टिप्पणी करणे असो किंवा एखाद्या महिलेच्या वैयक्तिक आयुष्याला राजकीय वादात ओढून दुहेरी अर्थाचे वक्तव्य करणे असो-या सगळ्यामागचा मूलभूत प्रश्न एकच आहे : स्त्रीला स्वतंत्र व्यक्ती म्हणून आपण स्वीकारतो तरी का?

स्त्री म्हणजे कुणाची पत्नी, कुणाची बहीण, कुणाची मुलगी, कुणाची प्रेयसी किंवा कुणाच्या कुटुंबातील व्यक्ती एवढीच तिची ओळख आहे का? ती स्वतःच्या विचारांची, निर्णयांची आणि राजकीय अस्तित्वाची स्वतंत्र व्यक्ती असू शकत नाही का? स्त्रीच्या राजकीय भूमिकेवर टीका करण्याऐवजी तिच्या वैयक्तिक नात्यांवर, शरीरावर किंवा स्त्रीत्वावर भाष्य करण्याची गरजच काय?

खरे तर हा ऑब्जेक्टिफिकेशनचा प्रश्न आहे. थेट राजकीय विरोधकावर टीका करण्यासाठी मुद्दे नसतील, तर त्याच्या जवळच्या स्त्रीला 'प्रॉक्सी टार्गेट' केले जाते. समोरच्याला चिथावायचे, संतापवायचे आणि त्यातून राजकीय फायदा उठवायचा. पण या तथाकथित राजकीय हुशारीला मर्दुमकी म्हणायचे का?

स्त्री गप्प बसली तर ती 'गुंगी बाहुली'; आणि पुरुष गप्प बसला तर तो संयमी, गंभीर आणि राजकारणात मुरलेला! हा दुहेरी निकष कुठून आला? एखादी स्त्री शांत आहे म्हणजे ती विचार करू शकत नाही, निरीक्षण करू शकत नाही किंवा योग्य वेळेची वाट पाहू शकत नाही, असा निष्कर्ष काढण्याचा अधिकार कोणाला दिला?

भारतीय राजकारणाच्या इतिहासातही अशा मानसिकतेची उदाहरणे सापडतात. इंदिरा गांधींच्या सुरुवातीच्या राजकीय काळात त्यांच्या शांत स्वभावाची खिल्ली उडवली गेली. 'गुंगी गुडिया'सारखी हेटाळणी करण्यात आली. मात्र पुढे त्याच इंदिरा गांधींनी आपल्या राजकीय कर्तृत्वाने टीकाकारांना उत्तर दिले. आज अनेक दशकांनंतरही स्त्री शांत राहिली की तिच्या क्षमतेवरच प्रश्न उपस्थित होत असतील, तर समाजाच्या मानसिकतेत बदल किती झाला, हा प्रश्न विचारायलाच हवा.

महत्त्वाचे म्हणजे ही कोणत्याही एका पक्षाची मक्तेदारी नाही. डाव्या विचारसरणीपासून काँग्रेसपर्यंत, प्रादेशिक पक्षांपासून सत्ताधारी पक्षांपर्यंत-वेगवेगळ्या राजकीय छावण्यांतील नेत्यांकडून महिलांबद्दल अशोभनीय वक्तव्ये झालेली आहेत. त्यामुळे या प्रश्नाकडे पक्षीय चष्म्यातून पाहणेच चुकीचे आहे.

एखाद्या महिला नेत्याची राजकीय भूमिका चुकीची वाटत असेल, तिची वक्तव्ये अतिशयोक्तीपूर्ण किंवा अविवेकी वाटत असतील, तर त्यावर कठोर टीका करा. तिच्या धोरणांना विरोध करा. तिच्या राजकीय भूमिकेची चिकित्सा करा. पण त्यासाठी अश्लील भाषेचा आधार घेण्याची गरज काय? कोणत्याही महिलेच्या चुकीच्या वक्तव्याचा निषेध करतानाही तिच्याबद्दल गलिच्छ भाषेचा वापर समर्थनीय ठरू शकत नाही. राजकारणात विरोधकाला हरवण्यासाठी विचारांची ताकद लागते. तथ्यांची गरज असते. तर्काची गरज असते. मुद्देसूद भाषेची गरज असते. जेव्हा हे सगळे अपुरे पडते, तेव्हा वैयक्तिक आणि लैंगिक टिप्पणींचा आधार घेतला जातो. ही मर्दुमकी नाही; हे राजकीय अपयश आहे.

स्त्रीबद्दल काहीही बोलू शकतो, तिला गृहीत धरू शकतो, तिच्या शांततेचा अर्थ आपल्या सोयीने लावू शकतो, असा अहंकार आता थांबायला हवा. स्त्री कोणाची मालमत्ता नाही. ती कोणाच्या राजकीय वादातील प्यादे नाही. ती कोणाच्या प्रतिष्ठेची सावलीही नाही. ती स्वतःच्या विचारांची आणि निर्णयांची स्वतंत्र व्यक्ती आहे.

म्हणूनच समस्त पुरुष वर्गाला एकच आग्रह-स्त्रीच्या शांततेला तिची कमजोरी समजू नका. तिच्या संयमाची परीक्षा घेऊ नका. आणि मुद्द्यांना उत्तर देता येत नसेल, तर तिच्या स्त्रीत्वावर घसरू नका.कारण स्त्रीचा अपमान हा तुमचा विजय नसतो; तो तुमच्या विचारांच्या दिवाळखोरीचा पुरावा असतो.

आता तरी हे समजून घ्या-स्त्रीला गृहीत धरण्याची मर्दुमकी कसली?

# हाशिवऱ्यात डेंग्यूसह साथीच्या रोगांविरोधात जनजागृती सभा



नागरिकांना प्रतिबंधात्मक उपायांचे मार्गदर्शन

। अलिबाग । हाशिवरे गावात डेंग्यूसह विविध साथीच्या रोगांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी मंगळवारी जनजागृती सभेचे आयोजन करण्यात आले. रायगड जिल्हा परिषद सदस्य तथा प्रतोद मा. श्री. अमितदादा नाईक यांच्या उपस्थितीत आणि आरोग्य अधिकारी मा. भोपळे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली ही सभा उत्साहात पार पडली.

हाशिवरे गावात डेंग्यूचे काही रुग्ण आढळून आल्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करणे, रोगांचा प्रसार रोखणे आणि प्रतिबंधात्मक उपायांची माहिती देणे हा या सभेचा प्रमुख उद्देश होता. यावेळी उपस्थित नागरिकांना डेंग्यूपासून बचाव करण्यासाठी आवश्यक असलेली काळजी, वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छतेचे महत्त्व, घर व परिसरात पाणी साचू न देणे, डासांची उत्पत्ती होऊ नये यासाठी आवश्यक उपाययोजना तसेच ताप, अंगदुखी, डोकेदुखी यांसारखी लक्षणे आढळल्यास त्वरित वैद्यकीय सल्ला घेण्याचे आवाहन करण्यात आले.

याशिवाय मलेरिया, चिकुनगुनिया व इतर पावसाळ्यात उद्भवणाऱ्या साथीच्या रोगांबाबतही नागरिकांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. गावातील प्रत्येक नागरिकाने स्वच्छतेची जबाबदारी स्वीकारून आरोग्य विभागाला सहकार्य करावे, असे आवाहन मान्यवरांनी केले.

आरोग्य विभागाच्या सहकार्याने राबविण्यात आलेल्या या जनजागृती अभियानात आरोग्य विभागाचे अधिकारी व कर्मचारी, हाशिवरे ग्रामपंचायतीच्या सरपंच, ग्रामपंचायत सदस्य तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. नागरिकांनी सभेला उत्स्फूर्त प्रतिसाद देत गाव डेंग्यूमुक्त ठेवण्यासाठी सामूहिक प्रयत्न करण्याचा निर्धार व्यक्त केला.



# साथीच्या रोगांवर नियंत्रणासाठी तातडीच्या उपाययोजना

## पेढांबे प्राथमिक आरोग्य केंद्रात आरोग्य समितीची मासिक सभा

। अलिबाग । शहापूर मतदारसंघातील पेढांबे प्राथमिक आरोग्य केंद्र येथे रायगड जिल्हा परिषद सदस्य तथा प्रतोद मा. श्री. अमितदादा नाईक यांच्या अध्यक्षतेखाली आरोग्य समितीची मासिक सभा उत्साहात पार पडली. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात साथीच्या रोगांचा वाढता धोका लक्षात घेऊन प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा आढावा घेण्यात आला. तसेच नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने विविध महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

सभेत डेंग्यू, मलेरिया, चिकुनगुनिया तसेच इतर साथीच्या आजारांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर तातडीने धूर फवारणी (फॉगिंग) आणि आवश्यक त्या ठिकाणी औषध फवारणी करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. गावांमध्ये स्वच्छता मोहीम प्रभावीपणे राबविणे, साचलेले पाणी त्वरित हटविणे, जनजागृती वाढविणे आणि आरोग्य विभागाने नियमित सर्वेक्षण करून संशयित रुग्णांवर तातडीने उपचार सुरू करण्यावर भर देण्यात आला.

यावेळी अमितदादा नाईक यांनी नागरिकांच्या आरोग्याला सर्वोच्च प्राधान्य देणे ही सर्व यंत्रणांची सामूहिक जबाबदारी असल्याचे सांगितले. साथीच्या रोगांचा प्रसार रोखण्यासाठी आरोग्य विभाग, ग्रामपंचायती आणि संबंधित सर्व विभागांनी परस्पर समन्वयाने काम करत आवश्यक उपाययोजनांची तातडीने अंमलबजावणी करावी, असे निर्देश त्यांनी दिले. या बैठकीस आरोग्य समितीचे अधिकारी व कर्मचारी, संबंधित विभागांचे अधिकारी तसेच जिल्हा परिषद सदस्य उपस्थित होते. सभेत विविध आरोग्यविषयक योजनांच्या अंमलबजावणीचाही आढावा घेण्यात आला.

# लेखी प्रश्न देण्याच्या सूचना; जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेत विविध विषयांवर सविस्तर चर्चा

। अलिबाग । रायगड जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत अभिनंदनाच्या ठरावांनंतर विविध विषयांवर सविस्तर चर्चा झाली. सभेच्या सुरुवातीलाच सदस्य मंगेश वाकडीकर यांनी कामकाज सुरू करण्याची सूचना केली. त्यानंतर सदस्य गीता जाधव यांनी सभेच्या इतिवृत्ताच्या अध्ययनासंदर्भात प्रश्न उपस्थित करत प्रशासनाला धारेवर धरले.

सभेदरम्यान पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील जिल्हा परिषद शाळांच्या हस्तांतरणाचा मुद्दाही चर्चेत आला. शिक्षण सभापती चंद्रकांत कळंबे यांनी माहिती देताना सांगितले की, या प्रक्रियेत जिल्हा परिषदेला एकूण ५५ कोटी रुपये मिळणार आहेत. पनवेल महापालिका क्षेत्रात जिल्हा परिषदेच्या एकूण ५४ शाळा असून त्यापैकी ५ शाळा जिल्हा परिषदेच्या मालकीच्या आहेत, तर उर्वरित शाळा खासगी आहेत. यातील ४९ शाळा महापालिकेकडे वर्ग करण्यात येणार आहेत. मिळणाऱ्या निधीपैकी २२ कोटी रुपये मुद्रांक शुल्क म्हणून महापालिकेकडे वर्ग करण्यात येतील, तर उर्वरित ३३ कोटी रुपये जिल्हा परिषदेला प्राप्त होतील. यावेळी काँग्रेसच्या सदस्यांनी जिल्ह्यातील सर्व शाळांचे स्ट्रक्चर ऑडिट करून विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित असलेल्या शाळांची माहिती पुढील सभेत सादर करण्याची मागणी केली. त्यावर शिक्षण सभापती चंद्रकांत कळंबे यांनी जिल्ह्यातील सर्व शाळांचे स्ट्रक्चर ऑडिट करण्यात येणार असून त्याचा अहवाल पुढील बैठकीत सादर केला जाईल, असे स्पष्ट केले.

# तळोज्यात लॉजवर छापा; अमली पदार्थांच्या रॅकेटचा पर्दाफाश

। नवी मुंबई । पोलिसांच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने तळोजा परिसरात धडक कारवाई करत गांजाची विक्री व पुरवठा करणाऱ्या प्रेमी युगुलाला अटक केली आहे. या कारवाईत २९ ग्रॅम गांजा, चार मोबाईल फोन आणि इतर साहित्य असा एकूण १ लाख २ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपींसह आणखी चार जण फरार असून त्यांचा शोध सुरू आहे.



पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार तळोजा येथील ओम साई रेसिडेन्सी लॉजवर छापा टाकण्यात आला. या कारवाईत पनवेलमधील वैभव वासुदेव म्हात्रे, वय - २५ आणि चंदीगड येथील करिष्मा प्रेम खडक, वय - २२ यांना ताब्यात घेण्यात आले. तपासादरम्यान दोघेही गेल्या वर्षभरापासून प्रेमसंबंधात असल्याचे निष्पन्न झाले. आरोपींकडून २९ ग्रॅम गांजा, चार मोबाईल फोन आणि इतर साहित्य जप्त करण्यात आले. प्राथमिक चौकशीत अमली पदार्थांच्या पुरवठ्यामागे मोठे रॅकेट कार्यरत असल्याची माहिती समोर आली असून, आरोपींकडून पोलिसांना या साखळीबाबत महत्त्वाचे धागेदोरे मिळाल्याचे सूत्रांनी सांगितले.

# गणेशोत्सवापूर्वी मुंबई-गोवा महामार्गाचे काम पूर्ण करण्याच्या सूचना

## मंत्री अदिती तटकरे यांची माणगाव बायपासच्या कामाची पाहणी





**। माणगाव ।** आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री अदिती तटकरे यांनी मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील माणगाव बायपास येथे सुरू असलेल्या रस्त्याच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी संबंधित अधिकारी व कंत्राटदारांकडून कामाच्या प्रगतीचा आढावा घेत त्यांनी कामाला अधिक गती देत ते दर्जेदार पद्धतीने आणि वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.

यावेळी मंत्री अदिती तटकरे म्हणाल्या की, लोकनेते आदरणीय अजितदादा पवार यांनी मागील वर्षी स्वतः या कामाची पाहणी करून रस्त्याच्या गुणवत्तेबाबत तसेच काम वेळेत पूर्ण करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक निर्देश दिले होते. महायुती सरकारच्या गतिमान धोरणांमुळे या महत्त्वाच्या प्रकल्पाचे काम वेगाने सुरू असून ते अंतिम टप्प्याकडे वाटचाल करत आहे.

गणेशोत्सवासाठी मोठ्या संख्येने कोकणात येणाऱ्या चाकरमान्यांचा प्रवास सुरक्षित, सुरळीत आणि सुखकर व्हावा, यासाठी बाप्पाच्या आगमनापूर्वी या मार्गावरील प्रवाशांना कोणताही त्रास होऊ नये, यावर विशेष भर देण्यात आला. यासाठी रस्त्याच्या कामाला आणखी गती देऊन ते निर्धारित मुदतीत पूर्ण करावे, अशा स्पष्ट सूचना मंत्री अदिती तटकरे यांनी संबंधित अधिकारी आणि कंत्राटदारांना दिल्या.

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील माणगाव बायपासचे काम पूर्ण झाल्यानंतर वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होणार असून कोकणात जाणाऱ्या लाखो गणेशभक्त व चाकरमान्यांचा प्रवास अधिक सुरक्षित, जलद आणि सुखकर होणार असल्याची अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

## यू बिझनेस मिट यांच्यावतीने इंडो-थाई बिझनेस कॉरिडोरचे उद्घाटन



**। बेलापूर ।** यू बिझनेस मिट आणि संलग्न संस्थांच्या वतीने नुकतेच नवी मुंबई ग्लोबल समिट चे आयोजन करण्यात आले होते. या नावीन्यपूर्ण उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्यानंतर यू बिझनेस मिट यांच्यावतीने इंडो-थाई बिझनेस कॉरिडोर चे उद्घाटन सोमवार दिनांक ३ ऑगस्ट रोजी बेलापूर येथील बी आर एस सी सी एल येथे करण्यात आले. आंतरराष्ट्रीय स्तरावर व्यवसाय संधी उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने प्रारंभ करण्यात आलेल्या संकल्पनेने मूर्त रूप धारण केले असून हे उद्घाटन म्हणजे या संकल्पनेची पुढली पायरी मानली जात आहे.


यू बिझनेस मिट चे संस्थापक वैभव सोनटक्के यांनी आपले सहकारी समृद्धी वाणी, पत्रकार विवेक पाटील, पत्रकार मंदार दोंदे आणि संलग्न संस्थांचे प्रमुख यांच्या उपस्थितीत इंडो-थाई बिझनेस कॉरिडोर ची निर्मिती केली आहे. एक्सपोर्ट इम्पोर्ट, मेडिकल टुरिझम, रिअल इस्टेट, ग्लोबल मिडिया, एंटरटेनमेंट इंडस्ट्री, मॅन्युफॅक्चरिंग इंडस्ट्री, क्लाऊड एंटरप्रेनरशिप, आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, बँकिंग अँड फायनान्स, कन्स्ट्रक्शन अशा नानाविध क्षेत्रातील होतकरू आणि विजिगीशू वृत्तीच्या व्यावसायिकांना थायलंड देशाबरोबर व्यवसाय करण्याकरता हे कॉरिडोर अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे असे वैभव सोनटक्के यांनी सांगितले.तसेच आगामी काळात मॉरिशस, दुबई आणि अमेरिका या देशांच्या समवेत क्रॉस बाउंड्री व्यवसाय करण्याकरता यू बिझनेस मीट पंख पसरणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# कामाच्या वेळेत रील बनविणे महागात

### पनवेल एसटी आगारातील तिघे कर्मचारी निलंबित

### दुहेरी अर्थाच्या गाण्यावर रील व्हायरल

### एसटी प्रशासनाची कठोर कारवाई, सोशल मीडिया धोरणावर चर्चा



**। पनवेल ।** पनवेल एसटी आगारातील महिला वाहक नंदा कोळी यांनी कामाच्या वेळेत दुहेरी अर्थाच्या गाण्यावर रील तयार केल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी) कठोर भूमिका घेत संबंधित तिन्ही कर्मचाऱ्यांना तातडीने निलंबित केले आहे. या कारवाईमुळे एसटी कर्मचाऱ्यांमध्ये विविध प्रतिक्रिया उमटत असून, सोशल मीडिया वापराबाबतच्या नियमांवर नव्याने चर्चा सुरू झाली आहे.

व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये महिला वाहक नंदा कोळी यांच्यासोबत वाहतूक नियंत्रक विजयकुमार माने आणि सुनील देशमुख हे देखील सहभागी असल्याचे दिसून आले. हा व्हिडिओ कामाच्या वेळेत आणि शासकीय कर्तव्य बजावत असताना चित्रित करण्यात आल्याचा प्राथमिक निष्कर्ष एसटी प्रशासनाने काढला आहे.

महामंडळाने केलेल्या प्राथमिक चौकशीत संबंधित कर्मचाऱ्यांच्या वर्तनामुळे एसटी महामंडळाची प्रतिमा जनमानसात मलिन झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. सार्वजनिक सेवेत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांनी सेवेची प्रतिष्ठा, शिस्त आणि आचारसंहितेचे पालन करणे अपेक्षित असते. या जबाबदारीला छेद देणारे वर्तन शिस्तभंगाच्या कक्षेत येत असल्याने कोणतीही दिरंगाई न करता तिन्ही कर्मचाऱ्यांना सेवेतून निलंबित करण्यात आल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

दरम्यान, या कारवाईनंतर एसटी कर्मचाऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. सोशल मीडियावर व्यक्त होणाऱ्या प्रत्येक कृतीवर प्रशासन अशाच प्रकारे लक्ष ठेवून कारवाई करणार का, असा प्रश्न अनेक कर्मचारी उपस्थित करत आहेत. काही कर्मचाऱ्यांनी शिस्तभंगाच्या बाबतीत कठोर कारवाईचे समर्थन केले असले, तरी वैयक्तिक अभिव्यक्ती आणि शासकीय सेवेतील शिस्त यामधील सीमारेषा स्पष्ट करण्याची गरज असल्याचे मतही व्यक्त केले जात आहे.

पान १ वरुन

## महसूल प्रशासन अधिक गतिमान व लोकाभिमुख करा

आपल्या सविस्तर मार्गदर्शनात महसूल मंत्री बावनकुळे यांनी सांगितले की, राज्यातील सर्व २८८ विधानसभा मतदारसंघांमध्ये 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान' यशस्वीरीत्या राबवले जात आहे. छत्रपती शिवरायांच्या राजधानीच्या जिल्ह्यात महसूल दिन साजरा होणे हा एक विशेष योग आहे. राज्यातील १४ कोटी जनतेच्या मालमत्तेचे रक्षण करून त्यांना सन्मानाने जगण्याचा हक्क देणारा महसूल हा अत्यंत पाठीचा कणा असलेला विभाग आहे. महिला सक्षमीकरणांतर्गत शेतात व उद्योगात कार्यरत महिलांना 'शेतकरी सन्मान कार्ड' दिले जाणार आहे. शेतपाणंद रस्त्यांचे मजबुतीकरण करून त्यांना शासकीय दप्तरी नोंदणीकृत केले जात असून, अलिबाग तालुक्यातील मुळे गावातील पाणंद रस्त्याचे काम पूर्ण झाले आहे. जिल्ह्यातील उर्वरित शेतपाणंद रस्ते पुढील तीन महिन्यांत शोधून त्यांचे सीमांकन करण्याचे निर्देशही त्यांनी प्रशासनाला दिले. शेतात पाणी, वीज आणि पक्का रस्ता उपलब्ध झाल्यास शेतकरीपुत्र समृद्ध होईल आणि विकसित महाराष्ट्राची संकल्पना पूर्णत्वास येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. याशिवाय तुकडेबंदी कायद्याची अंमलबजावणी, रहिवासी घरे कायदेशीर करणे, स्वामित्व व नक्षा योजनेद्वारे मोफत मोजणी, रेवस-रेड्डी महामार्गाची निर्मिती आणि वनहक्क पट्ट्यांतर्गत सुमारे ६० ते ६५ हजार आदिवासी बांधवांना मालकी हक्काचे '७ ई व १२ ई' सातबारा देऊन त्यांच्या बळकावलेल्या जमिनी परत मि ळवण्यासाठी विशेष मोहीम राबवण्याची ग्वाही त्यांनी दिली.

कार्यक्रमात बोलताना खासदार सुनील तटकरे यांनी महसूल विभागाच्या गतिमान कारभाराचे कौतुक करत हा विभाग सर्वसामान्य माणसाच्या दैनंदिन जीवनाशी थेट जोडलेला असल्याचे सांगितले. दक्षिण रायगडमधील वाढत्या औद्योगिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर प्रशासन नागरिकांच्या समस्यांचे प्रभावी निवारण करत असल्याचे त्यांनी नमूद केले.

रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंती व वाढदिवसाचे औचित्य साधून राबवलेल्या अभियानाचे कौतुक करत कोकणातील शेतकरी हा स्वाभिम ानी व वेळेवर कर्ज फेडणारा असल्याचे अधोरेखित केले. म हिला व बाल विकास मंत्री कु. आदिती तटकरे यांनी 'शासन आपल्या दारी' उपक्रमाचे पुढचे प्रगतीचे पाऊल म्हणजे हे महाराजस्व अभियान असल्याचे सांगत, प्रत्येक पंचायत समिती गणापर्यंत योजना पोहोचवण्याचे आणि महिला दिनानिमित्त विशेष शिबिरे आयोजित करण्याचे आवाहन केले. आमदार महेंद्र दळवी व आमदार विक्रांत पाटील यांनी आपल्या भाषणात शिवछत्रपतींच्या राजधानीच्या जिल्ह्यात रयतेचे राज्य साकारण्यासाठी आणि सर्वसामान्य लाभार्थ्यांना एकाच छताखाली योजनांचा लाभ देण्यासाठी हे अभियान अत्यंत स्तुत्य असल्याचे मत व्यक्त केले. विभागीय आयुक्त श्रीमती रुबल अग्रवाल आणि प्रास्ताविक करताना जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी रायगड जिल्हा हा शेतकरी आत्महत्यामुक्त जिल्हा असल्याची गौरवपूर्ण नोंद करत महसूल खात्याची प्रतिमा उंचावण्यासाठी व पारदर्शकता आणण्यासाठी जिल्हा प्रशासन सदैव कटिबद्ध असल्याचे सांगितले.

समारंभाच्या प्रारंभी मंत्री महोदयांसह सर्व मान्यवरांनी विविध शासकीय विभागांद्वारे उभारण्यात आलेल्या माहितीपूर्ण स्टॉल्सला भेट देऊन योजनांची पाहणी केली. राष्ट्रगीत आणि दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची औपचारिक सुरुवात झाली. या सोहळ्यात महसूल दिनाचे औचित्य साधून उत्कृष्ट कार्य करणाऱ्या महसूल विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा महसूल मंत्री व मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन विशेष गौरव करण्यात आला.

या भव्य सोहळ्यास शासकीय विभागांचे अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खालापूरात घोंगावले शेकापचे ‘लाल वादळ’

## ७९व्या वर्धापन दिनी २५ हजार कार्यकर्त्यांची उपस्थिती; भव्य रॅलीतून जोरदार शक्तिप्रदर्शन

**। खालापूर ।** सत्यशोधक विचारांचा वारसा जपत शेतकरी, कष्टकरी, श्रमिक, कामगार, विद्यार्थी, मजूर आणि भूमिहीनांच्या न्यायहक्कांसाठी सातत्याने लढणाऱ्या शेतकरी कामगार पक्षाच्या ७९व्या वर्धापन दिनानिमित्त खालापूर येथे आज अभूतपूर्व शक्तिप्रदर्शन पाहायला मिळाले. लाल झेंड्यांनी सजलेल्या खालापूर नगरीत रायगडसह राज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या सुमारे २५ हजारांहून अधिक कार्यकर्त्यांच्या उपस्थितीने संपूर्ण परिसर दणाणून गेला.

वर्धापन दिनानिमित्त आयोजित भव्य रॅली आणि जाहीर मेळाव्याला कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. हातात लाल झेंडे, डोक्यावर लाल टोप्या आणि घोषणांनी भारलेले वातावरण यामुळे खालापूरमध्ये शेकापच्या विचारांची आणि संघटनात्मक ताकदीची प्रभावी झलक पाहायला मिळाली. सकाळपासूनच विविध भागांतून कार्यकर्त्यांचे जत्थे खालापूरकडे दाखल होत होते. त्यामुळे शहर परिसराला जणू लाल रंगाची किनार लाभली होती.





शेतकरी, कष्टकरी आणि कामगारांच्या प्रश्नांसाठी पक्षाने उभारलेल्या विविध लढ्यांचा आढावा घेत आगामी काळातील सामाजिक आणि राजकीय आव्हानांना सामोरे जाण्यासाठी संघटन अधिक म जबूत करण्याचा निर्धार या मेळाव्यात व्यक्त करण्यात आला. रायगडसह राज्यभरातून आलेल्या हजारो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीमुळे पक्षाच्या संघटनात्मक ताकदीला नवसंजीवनी मिळाल्याचे चित्र निर्माण झाले.

या कार्यक्रमात सामाजिक आणि क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या पद्मश्री भिकल्या धिंडा तसेच आंतरराष्ट्रीय क्रीडापटू शीतल गायकवाड यांचा विशेष सत्कार करण्यात आला. त्यांच्या कार्याचा गौरव करताना समाजातील विविध घटकांच्या योगदानाला प्रोत्साहन देण्याची पक्षाची भूमिका अधोरेखित करण्यात आली. मेळाव्याला शेकापचे ज्येष्ठ नेते, पदाधिकारी, महिला आघाडी, युवक आघाडीचे कार्यकर्ते तसेच विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी शेतकरी आणि कामगारांचे प्रश्न, वाढती म हागाई, रोजगार, भूमिहीनांचे प्रश्न, सामाजिक विषमता तसेच सर्वसामान्यांच्या हक्कांसाठी आगामी काळात अधिक आक्रमकपणे लढा उभारण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

शेकापचा ७९वा वर्धापन दिन हा केवळ उत्सव न राहता आगामी राजकीय आणि सामाजिक लढ्यांची नांदी ठरेल, असा ठाम विश्वास उपस्थित नेत्यांनी व्यक्त केला. २५ हजारांहून अधिक कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत झालेल्या या विराट मेळाव्यामुळे रायगडच्या राजकीय पटलावर शेकापने आपल्या संघटनात्मक ताकदीचे पुन्हा एकदा प्रभावी प्रदर्शन घडवून आणल्याचे चित्र दिसून आले.

# बँकिंगमधील नवे वळण : सार्वजनिक क्षेत्रातून सहकारी बँकांकडे... एक नव्या पर्वाची चाहूल!

**(भाग १) : भारताच्या बँकिंग क्षेत्रात आज एक शांत पण अत्यंत महत्त्वाचा बदल घडत आहे. हा बदल आकडेवारीत फारसा दिसत नाही;**

तो दिसतो तरुण अधिकाऱ्यांच्या निर्णयांमध्ये. काही वर्षांपूर्वी सार्वजनिक क्षेत्रातील बँकेत (PSB) प्रोबेशनरी ऑफिसर म्हणून निवड होणे हे अनेक तरुणांचे स्वप्न असायचे. णझड्उ नंतर सर्वाधिक प्रतिष्ठेच्या करिअरपैकी ते एक मानले जात होते. कठोर स्पर्धा, अनेक टप्प्यांच्या परीक्षा आणि मुलाखती पार करून जे अधिकारी या क्षेत्रात येत, ते आयुष्यभर या क्षेत्रातच राहतील, असे गृहित धरले जात असे.

मात्र आज चित्र बदलत आहे. अनेक तरुण अधिकारी सार्वजनिक क्षेत्रातील बँका सोडून राज्य सरकारी सेवा, सार्वजनिक उपक्रम आणि इतर पर्याय स्वीकारत आहेत. हे अधिकारी अपयशी नाहीत. उलट, ते अत्यंत सक्षम, तांत्रिकदृष्ट्या प्रगल्भ आणि भविष्याचे नेतृत्व करू शकणारे आहेत. प्रश्न त्यांच्या क्षमतेचा नाही; प्रश्न आहे त्यांच्या अपेक्षांचा आणि बदललेल्या वास्तवाचा. आजचा तरुण अधिकारी फक्त पगाराकडे पाहत नाही. तो स्वतःला एक प्रश्न विचारतो–या करिअरमुळे मला आयुष्य मिळते आहे का, की फक्त नोकरी?



**संदीप जयश्री नरेश जगे**
**एमबीए(मार्केटिंग), एएलएलबी,एमए (इकॉनॉमिक्स) जेआयआयबी, डिप्लोमा इन जर्नलिझम, बीएस्सी**
**सिनियर मॅनेजर, आरडीसीसी बँक अलिबाग**

गेल्या काही वर्षांत सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमध्ये व्यवसायाची व्याप्ती प्रचंड वाढली आहे. नियामक अनुपालन (Compliance), जोखीम व्यवस्थापन (Risk Management), मनी लॉन्डरिंग प्रतिबंधक नियम, सायबर सुरक्षा, डिजिटल बँकिंग, लेखापरीक्षण, सतर्कता, ग्राहक संरक्षण, तंत्रज्ञानातील बदल या सर्व जबाबदाऱ्यांची भर अधिकाऱ्यांवर पडत आहे. या जबाबदाऱ्या आवश्यक आहेत; पण त्याचबरोबर त्यांचा मानसिक आणि वैयक्तिक आयुष्यावर परिणामही होत आहे. यात आणखी भर पडते ती सततच्या बदल्यांची. अनेक अधिकारी आपल्या मूळ गावापासून किंवा कुटुंबापासून शेकडो किलोमीटर दूर अनेक वर्षे कार्यरत असतात. लहान मुलांचे शिक्षण, वृद्ध आई–वडिलांची काळजी, पती–पत्नी दोघांच्या नोकऱ्या–या सर्व वास्तवांमध्ये वारंवार होणाऱ्या बदल्या केवळ प्रशासकीय निर्णय राहत नाहीत; त्या वैयक्तिक आयुष्याचा भाग बनतात. पदोन्नतीचे चित्रही तितकेच आव्हानात्मक आहे. कर्मचारी रचना पिरॅमिडसारखी असल्याने कनिष्ठ स्तरावर अधिकारी मोठ्या संख्येने असतात; मात्र वरिष्ठ पदे मर्यादित असतात. परिणामी अनेक गुणवंत अधिकारी वर्षानुवर्षे पुढील संधीची वाट पाहत राहतात. कामगिरी असूनही संधी कमी असणे ही निराशेची बाब ठरते.

याशिवाय, अनेक बँकांमध्ये वरिष्ठ पदांवर थेट (Lateral) भरती वाढू लागली आहे. बाहेरील क्षेत्रातील तज्ज्ञांना वरिष्ठ स्तरावर नियुक्त केले जाते. नवीन कल्पना आणि अनुभव संस्थेला उपयुक्त असतात, यात शंका नाही; पण अनेक वर्षे संस्थेत काम करून अनुभव मिळवलेल्या अधिकाऱ्यांच्या मनातही प्रश्न निर्माण होतो–आपल्या मेहनतीचे पुढे काय?

याच काळात बँकिंगमधील अनेक विशेष कामे–माहिती तंत्रज्ञान, जोखीम व्यवस्थापन, मानव संसाधन प्रक्रिया, प्रकल्प व्यवस्थापन, विश्लेषण–हळूहळू बाह्य सल्लागार संस्थांकडे दिली जात आहेत. बँकेतच प्रशिक्षित आणि सक्षम अधिकारी असतानाही त्यांचा पूर्ण उपयोग होत नाही, अशी भावना अनेकांना वाटू लागली आहे.

याचा अर्थ सार्वजनिक क्षेत्रातील बँका कमकुवत आहेत, असा अजिबात नाही. उलट, देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा आजही सार्वजनिक क्षेत्रातील बँकाच आहेत. आर्थिक समावेशन, शेती, पायाभूत सुविधा, लघुउद्योग, सामाजिक योजनांची अंमलबजावणी–या सर्व क्षेत्रांत त्यांचे योगदान अनन्यसाधारण आहे. परंतु एक महत्त्वाचा प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे. या सर्व बदलांच्या पार्श्वभूमीवर, आजच्या बँक अधिकाऱ्याला आणखी कोणता मार्ग उपलब्ध आहे? याचे उत्तर कदाचित आपण अनेक वर्षे दुर्लक्षित केलेल्या क्षेत्रात दडलेले आहे.

ते क्षेत्र म्हणजे–सहकारी बँकिंग.

एक काळ असा होता की सहकारी बँकांकडे फक्त स्थानिक पर्याय म्हणून पाहिले जात असे. पण गेल्या दशकात परिस्थिती झपाट्याने बदलली आहे. कोअर बँकिंग प्रणाली, डिजिटल व्यवहार, मोबाईल बँकिंग, णझख, सायबर सुरक्षा, RBI चे कठोर नियमन, N-B-RD चे मार्गदर्शन, व्यावसायिक व्यवस्थापन आणि स्पर्धात्मक सेवा–या सर्वांमुळे अनेक सहकारी बँका नव्या युगात प्रवेश करत आहेत. आज त्यांच्यासमोर एक वेगळे आव्हान आहे. तंत्रज्ञान आहे... पण अनुभवी नेतृत्व हवे आहे. व्यवसाय आहे... पण आधुनिक बँकिंग समजणारे अधिकारी हवेत वाढीची इच्छा आहे... पण ती प्रत्यक्षात आणणारे व्यावसायिक हवेत. आणि नेमके इथेच सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमध्ये घडलेले हजारो अधिकारी सहकारी बँकिंगसाठी एक मोठी ताकद ठरू शकतात.

**भाग २ : कदाचित तुम्ही शोधत असलेले उत्तर सहकारी बँकिंगमध्ये आहे...**

सहकारी बँकांमध्ये सुरुवातीचा पगार कदाचित सार्वजनिक क्षेत्रातील किंवा मोठ्या खासगी बँकांइतका नसेल. हा एक निर्विवाद वास्तव आहे. परंतु करिअरचे यश केवळ पगाराच्या आकड्यांनी मोजले जाते का? आज अनेक तरुण अधिकारी वेगळाच प्रश्न विचारत आहेत–माझ्या मुलांसोबत घालवलेला वेळ, वृद्ध आई–वडिलांची सेवा, मानसिक शांतता, समाजाशी जोडलेले काम आणि निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य यांची किंमत किती? याच प्रश्नाचे उत्तर अनेकदा सहकारी बँकिंगमध्ये सापडते.

सहकारी बँकांमध्ये काम करणारा अधिकारी अनेकदा आपल्या जिल्ह्यात, विभागात किंवा जवळच्या परिसरात कार्यरत असतो. प्रत्येक संस्थेचे धोरण वेगळे असले, तरी वारंवार देशभर बदल्या होण्याची शक्यता तुलनेने कमी असते. त्यामुळे कुटुंब, मुलांचे शिक्षण आणि सामाजिक आयुष्य यामध्ये अधिक स्थैर्य मिळू शकते. अनेक अधिकाऱ्यांसाठी ही बाब पगारवाढीपेक्षाही महत्त्वाची ठरते.

सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमध्ये मोठ्या संस्थात्मक रचनेमुळे एखादा अधिकारी विशिष्ट कामापुरताच मर्यादित राहू शकतो. पण सहकारी बँकांमध्ये चित्र अनेकदा वेगळे असते. येथे एका अधिकाऱ्याला व्यवसाय विकास, कर्ज, जोखीम व्यवस्थापन, तंत्रज्ञान, ग्राहक सेवा, नियामक अनुपालन, लेखापरीक्षण, जनसंपर्क आणि संस्थात्मक विकास अशा विविध क्षेत्रांत काम करण्याची संधी मिळू शकते. त्यामुळे त्याचा सर्वांगीण व्यावसायिक विकास होतो. आज सहकारी बँकांनाही ठ्इख चे वाढते नियमन, सायबर सुरक्षा, माहिती तंत्रज्ञान, डेटा ॲनालिटिक्स, कृत्रिम बुद्धिमत्ता (-I), डिजिटल बँकिंग, KYC, -ML, जोखीम व्यवस्थापन, अंतर्गत नियंत्रण, ESG, माहिती सुरक्षा आणि गव्हर्नन्स या सर्व क्षेत्रांत सक्षम मनुष्यबळाची गरज आहे. म्हणूनच सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमध्ये घडलेला अधिकारी सहकारी बँकेत केवळ कर्मचारी राहत नाही; तो परिवर्तनाचा भाग बनू शकतो. आज अनेक सहकारी बँका व्यवसायात हजारो कोटी रुपयांच्या टप्प्यावर पोहोचल्या आहेत. काही बँका कोअर बँकिंग, मोबाईल बँकिंग, णझख, डिजिटल कर्ज प्रक्रिया, डेटा सेंटर, सायबर सुरक्षा आणि आधुनिक ग्राहक सेवांमध्ये मोठी गुंतवणूक करत आहेत. त्यांना अशा अधिकाऱ्यांची गरज आहे, ज्यांनी मोठ्या संस्थांमध्ये काम केले आहे आणि ज्यांना आधुनिक बँकिंगची जाण आहे. याच ठिकाणी सार्वजनिक क्षेत्रातील बँकांतील अनुभवी अधिकारी सहकारी बँकांचे भवितव्य बदलू शकतात. कल्पना करा...

एखादा अधिकारी, ज्याने Compliance, Risk Management, Fraud Prevention, Treasury, Credit, HR, IT qH$dm Digital Banking मध्ये अनेक वर्षे काम केले आहे, तो सहकारी बँकेत आला तर?

तो फक्त एक पद भरत नाही. तो संपूर्ण संस्थेची कार्यसंस्कृती बदलू शकतो. तो तरुण कर्मचाऱ्यांना घडवू शकतो. तो व्यवस्थापनाला आधुनिक बँकिंगचा दृष्टीकोन देऊ शकतो. तो तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर वाढवू शकतो. तो ग्राहक सेवेची गुणवत्ता उंचावू शकतो. तो नियामक अनुपालन अधिक मजबूत करू शकतो. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे...

तो सहकारी बँकेला पुढील दशकासाठी सक्षम बनवू शकतो. सहकारी बँकिंग हे फक्त लहान बँकिंग नाही. ते स्थानिक अर्थव्यवस्थेचे धडधडणारे हृदय आहे. शेतकरी, स्वयंरोजगार करणारे, महिला बचत गट, लघुउद्योग, व्यापारी, विद्यार्थी आणि सामान्य नागरिक यांच्याशी सर्वाधिक जवळून काम करणारी व्यवस्था म्हणजे सहकारी बँकिंग. मोठ्या बँकेत तुम्ही लाखो खात्यांपैकी एका खात्याचे व्यवस्थापन करत असाल. सहकारी बँकेत तुम्ही संपूर्ण समाजाच्या आर्थिक प्रवासाचा भाग बनू शकता. आज भारतात सहकारी बँकिंगचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. व्यावसायिक व्यवस्थापन, तंत्रज्ञान, पारदर्शकता आणि नियामक शिस्त यामुळे या क्षेत्रासमोर नव्या संधी उभ्या राहत आहेत. मात्र या परिवर्तनाला सक्षम नेतृत्वाची गरज आहे. ते नेतृत्व बाहेरून विकत घेता येत नाही. ते घडवावे लागते. आणि ते घडवण्यासाठी सार्वजनिक क्षेत्रातील, खासगी बँकांतील आणि इतर वित्तीय संस्थांतील अनुभवी अधिकाऱ्यांइतका मौल्यवान स्रोत दुसरा नाही. कदाचित पुढील दशकात सहकारी बँकांची खरी स्पर्धा शाखांच्या संख्येवर किंवा व्यवसायाच्या आकड्यांवर नसेल.ती असेल सर्वोत्तम प्रतिभा आकर्षित करण्याची. ज्या सहकारी बँका उत्कृष्ट व्यावसायिकांना आकर्षित करतील, त्याच पुढील काळात ग्राहकांचा विश्वास, व्यवसायाची वाढ आणि तांत्रिक परिवर्तन यामध्ये आघाडीवर राहतील. आणि म्हणूनच आज एक वेगळे आवाहन करण्याची वेळ आली आहे. जर तुम्ही अशा करिअरच्या शोधात असाल जिथे तुमच्या अनुभवाला किंमत आहे... जिथे तुमच्या निर्णयांना अर्थ आहे... जिथे तुमच्या कामाचा परिणाम थेट समाजावर दिसतो... जिथे व्यावसायिक यशासोबत वैयक्तिक आयुष्यालाही स्थान आहे... तर एकदा सहकारी बँकिंगकडे नव्या नजरेने पाहा. कारण... कदाचित तुम्ही अजूनही मोठी बँक शोधत आहात. पण आज अनेक सक्षम सहकारी बँका तुमच्यासारख्या मोठ्या बँकरच्या शोधात आहेत. भारतीय बँकिंगचे पुढचे पर्व केवळ महानगरांतील काचेच्या इमारतींमध्ये लिहिले जाणार नाही. ते जिल्ह्यांमध्ये, तालुक्यांमध्ये आणि सहकाराच्या भूमीतही लिहिले जाईल. प्रश्न इतकाच आहे–त्या परिवर्तनाचा भाग तुम्ही असणार का?

THIS PERIODICAL IS PUBLISHED BY DHANANJAY ARVIND KAVTHEKAR FROM HOUSE NO.38, NEAR MARUTI MANDIR, MARATH ALI, RAMRAJ, RAIGARH, MAHARASHTRA-402203 ON BEHALF OF DHANANJAY ARVIND KAVTHEKAR EDITED BY DHANANJAY ARVIND KAVTHEKAR AND PRINTED BY VIJAY SHIVAJI WAREKAR, JAGRUTI PRINTERS, B-101, 1ST FLOOR, D.K.CROSS MARG, NEAR RANIBUAG, BYCULL SERVICE INDUSTRIAL ESTATE, MUMBAI, MAHARASHTRA-400027".
**EMAIL ID. - metroraigad@gmail.com**
MOB.NO. 9272720720